Coverage Report: TCS IT Wiz – Mumbai Edition

**Publication:** Pudhari
**Date:** 8/11/2014
**Edition:** Mumbai
**Page No:** 5
**Headline:** 'TCS IT Wiz 2014' Mumbai round from 16 November

# टीसीएसची आयटी क्विझची फेरी १६ नोव्हेंबरला

**मुंबई : प्रतिनिधी**

टीसीएस कंपनीतर्फे टीसीएस आयटी विझ २०१४ ची मुंबईतील फेरी १६ नोव्हेंबर रोजी मुंबईतील वांद्रे रेक्लमेंशन येथील लिलावती हॉस्पिटलसमोरील इंडियन एज्युकेशन सोसायटी, माणिक सभागृह येथे पार पडणार आहे.

इयत्ता आठवी ते बारावीतील विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी होऊ शकतात. या स्पर्धेत सहभागी होण्यास इच्छूक असलेली कोणतीही शाळा दहा संघ पाठवू शकतो. एका संघात फक्त दोनच स्पर्धक असणे बंधनकारक आहे. स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या शाळांना १४ नोव्हेंबरपर्यंत आपले प्रवेश अर्ज टीसीएस कंपनीच्या फोर्ट येथील कार्यालयात पाठवावे लागणार आहेत. लेखी प्राथमिक परीक्षेत यशस्वी झालेल्या पहिल्या सहा संघांना विभागीय अंतिम फेरीत सहभागी होता येणार आहे. अंतिम फेरीसाठी एकाच शाळेचे एकापेक्षा जास्त संघ पात्र ठरले असल्यास त्यापैकी सर्वोत्कृष्ट संघालाच अंतिम फेरीत प्रवेश दिला जाणार आहे. विभागीय अंतिम फेरीत विजेत्या ठरलेल्या संघाला डिसेंबरमध्ये महाअंतिम फेरीत सिंगापूर व युएई येथील संघासोबत सहभागी होता येईल.